# सहकार करा - सहकार करा ...

कालस्वर युगधर्म जाणूनी
समजून घ्या सहकार खरा
समृद्धीचा मूलमंत्र हा
सहकार करा - सहकार करा ।।धृ।।
माती पाणी उजेड वारा
सकला देती प्रेम आसरा
अन्योन्यास्तव प्रपंच सारा
मानवास सांगतसे सृष्टी
सहकारच जीवनधारा ।।1।।
भेद नुरावे पंथ मिटावे
समतेचे सेतू बांधावे
दुरितांच्या तिमिरा हरावे
क्रमाक्रमाने उलगडणारी
नवरचना साकार करा।।2।।
आम्हीच आमुचे भाग्यविधाते
दु:ख विमोचक त्राते धाते
प्रयत्नेच सौभाग्य विकसते
मरू-भूमिवर स्वर्ग फुलविण्या,
एकच पथ हा नच दुसरा ।।3।।
पाठराखणी जनतंत्राची
ग्वाही व्यक्तिस्वातंत्र्याची
दिशा सकलजन उत्कर्षाची
वेद नवा लिहीला, स्वेदाने तो झाला सहकार खरा ।।4।।
कृषकांनो, श्रमिकांनो याऽरे
शोषित पीडित, दलितही याऽरे
महिलांनो, युवकांनो याऽऽरे
आव्हानाचा गोवर्धन हा
तळहाती तोलून धरा ।।5।। सहकार करा - सहकार करा ...